म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय का. वा.
दा. क्र. २३७२

२३७२

दा. क्र.- २३७२

# तीर्थ

प. सा.

IRBK-0102372
IRBK-0102372

नाटके

म. ग्रं. सं. ठाणे
विषय बालवाङ्मय
वा. नं. १८

म. ग्रं. सं. ठा.
विषय

# तिघे प्रवासी



नवभारत प्रकाशन संस्था

2 5 AUG 1976

ल-वाङ्मयमाला १७

म. ग्रं. सं. ठाणें.
न. ग्र. २८

# तिघे प्रवासी

आणि

# इतर गोष्टी

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
अ. क्र. २३५२ ग्रं. वि.
वि. लेखक

माधव केशव काटदरे

किंमत सहा आणे

IRBK-0102372

नवभारत प्रकाशन संस्था मुंबई, ४.

: प्रकाशक :

रघुनाथ दिपाजी देसाई,

नवभारत प्रकाशन संस्था,—मुंबई ४.

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

प्रथमावृत्ति, नोव्हेंबर १९४१

पुनर्मुद्रण, डिसेंबर १९४६

: मुद्रक :

रघुनाथ दिपाजी देसाई,

न्यू भारत प्रिंटिंग प्रेस,

६, केळेवाडी गिरगांव, मुंबई नं. ४

# १. तिघे प्रवासी

सुट्टींत घरीं आलेले वासूकाका तिनिसांजेच्या वेळीं पडवींतल्या झोंपाळ्यावर एकटेच बसलेले होते.

मुलांमध्यें वासूकाकांची अशी प्रसिद्धि होती कीं ते छान छान गोष्टी सांगण्यांत मोठे पटाईत आहेत.

छोटा बन्या माजघरांतून ओटीदारीं आला. काका झोंपाळ्यावर बसलेले आहेत असें त्यानें हळूच पाहिलें. तो लगेच मागें परतला आणि आपल्या भावंडांना त्यानें काका झोंपाळ्यावर असल्याची वर्दी दिली.

थोड्याच वेळांत ओटीवर मुलांची गर्दी जमली.

"काका, गोष्ट ! काका गोष्ट !" काकांकडे सर्व मुलांनीं एकच मागणी केली.

"गोष्ट ?" वासूकाका म्हणाले, "आतां रे कुठली गोष्ट ? माझ्या जवळचा गोष्टींचा सांठा मागल्या सुट्टींतच तुम्हीं सगळा खलास करून टाकलात !"

"पण काका," वेणू म्हणाली, "तुम्हींच ना मागल्या खेपेला म्हणाले होतेत ?"

"काय म्हणालों होतों मी ?" काकांनीं विचारलें.

"काळें वांगें, हिरवा देंठ, नि पुढल्या सुट्टींत तुमची आमची भेट; असें." वेणूनें उत्तर दिलें.

"पुढल्या सुट्टींत तुमची आमची भेट होईल असें मीं म्हटलें होतें. गोष्ट सांगेन असें कुठें मीं म्हटलें होतें ?" काका हंसत म्हणाले, "भेट होईल म्हटलें त्याप्रमाणें या सुट्टींत तुमची आमची भेट झाली !"

"ज्या भेटींत गोष्ट नाहीं ती कसली भेट ?" वेणूनें म्हटलें.

"माझ्याजवळच्या गोष्टी ऐकून ऐकून तुम्हीं सगळ्या

संपवल्यात ! आतां तुम्हांला सांगण्यासाठीं मी गोष्ट आणूं कुठली ? " काका म्हणाले.

" तुमच्याजवळच्या सगळ्याच गोष्टी कांहीं संपल्या नसतील ! एक तरी गोष्ट शिल्लक असेल तुमच्याजवळ !" दामू बोलला.

" एक कां ?" पांडू डोळे मिचकावीत म्हणाला, "चांगल्या दोन तीन तरी गोष्टी शिल्लक असल्या पाहिजेत अजून काकांजवळ !"

" दोन तीन गोष्टींनीं काय होईल ?" सई बोलली, " काकांजवळचा गोष्टींचा सांठा कधींच संपायचा नाहीं ! समजलास ? "

सई असें बोलतांच " काका गोष्ट ! काका गोष्ट !" असा सर्व मुलांनीं एकच गिल्ला केला.

" एक गोष्ट मला आठवली आहे. " काका म्हणाले, "पण तुम्हांला ती कितपत आवडेल, कुणाला ठाऊक. "

" आवडेल ! आवडेल ! " आतां गोष्ट ऐकायला मिळणार म्हणून मुलें आनंदून म्हणालीं; " सांगा ती गोष्ट आम्हांला ! "

" ऐका तर ! " काका म्हणाले, नि गोष्ट सांगूं लागले.

एक होता चाट्या. चाट्या म्हणजे बोटें चाटींत बसणारा नव्हे बरें का. चाट्या म्हणजे कापडाचा व्यापारी. त्या चाट्याला कापडाच्या व्यापारांत एकदां बरेंच नुकसान आलें. नुकसान आल्यामुळें त्याला फार वाईट वाटलें.

" शहाण्या माणसानें आपल्या लोकांशीं कधीं व्यवहार करूं नये !" चाट्या मनांत म्हणाला, " केला म्हणजे त्याचें हें असें होतें ! व्यापार धंदा करावा परमुलखांत नि तिकडे पैसा कमावून मान संपादावा आपल्या लोकांत ! बस् ! ठरला विचार ! आतां परमुलखांत जायचें नि तिकडे नशीब काढायचें !"

चाट्यानें लवकरच आपलें घर सोडलें. त्याच्यापाशीं जें थोडेंसें कापडचोपड शिल्लक होतें त्याचा गठ्ठा त्यानें आपल्या पाठीवर बांधला आणि तो परदेशांत जाण्यासाठीं निघाला.

तो फारसा दूर गेला नसेल तोंच त्याला एक सुतार भेटला. चाट्या ज्या दिशेला चालला होता त्याच दिशेला

सुतारालादेखील जायचें होतें. म्हणून ते दोघे बरोबर चालले. वाट चालत असतांना चाट्यानें आपली सगळी हकीगत सुताराला सांगितली. ती ऐकून सुतार म्हणाला,

"गड्या! माझीदेखील हीच अवस्था झाली रे! माझ्यासारखा कसबी सुतार इकडल्या पट्ट्यांत तरी सांपडणार नाहीं! पण माझें कसब कोणाला, जे ख़रे पारखी असतील त्यांना. इकडे तर सगळे गावढळ लोक. त्यांना काम स्वस्त मिळेल तितकें हवें. मग तें कसें असलें तरी चिंता नाहीं! या गोष्टीला मी फार त्रासलों बुवा! शेवटीं विचार केला, ज्या ठिकाणीं आपल्या कसबाची पारख नाहीं, नि गुणांची बूज नाहीं, तेथें आपण रहावेंच कशाला? आपण बाहेरदेशीं चालतें व्हावें आणि तिकडे नशीब काढावें तें चांगलें! असा विचार करून मी बाहेर पडलों आहें."

ते दोघे गोष्टी बोलत बोलत सुमारें अर्धा कोस चालले असतील नसतील, तोंच त्यांना तिसरा एक मनुष्य येऊन मिळाला. तो लांकूडतोड्या होता.

"वैताग आला बुवा आतां इथें राहण्याचा नि हीं

लांकडें फोडण्याचा !" लांकूडतोड्या पहिल्या दोन प्रवाश्यांना म्हणाला, "लांकडांच्या पैशावर मला इकडे पोटभर भाकरीदेखील मिळत नाहीं ! तेव्हां काय करणार ? बाहेर देशांत गेलास तर तिकडे तुझें नशीब उघडेल असें काल मला एकानें सांगितलें. म्हणून मी लागलाच आज निघालों. वाटेनें तुमची सोबत मिळाली एवढें तरी बरें झालें ! नाहींतर वाटेनें एकटेंच जाण्याची पाळी आली असती."

चाट्या आणि सुतार या दोघांनीं लांकूडतोड्याला आपआपली हकीगत सांगितली. ती ऐकून लांकूडतोड्या उद्गारला, "आपण सगळे समदुःखी आहोंत तर !"

परदेशांत होतां होईल तितकें करून तिघांनीं एकमेकांजवळ रहावयाचें असा त्यांचा विचार झाला आणि ते पुढें चालले. दुपारपर्यंत चालल्यावर त्यांना थकल्यासारखें वाटूं लागलें.

विसांवा घेण्यासाठीं एका झाडाच्या सांवलींत ते बसले.

थोड्या वेळानें एक म्हातारी बाई काठी टेंकीत

टेंकीत तेथें आली. ते तिघे बसले होते तेथें जवळच तीहि पण येऊन बसली.

"हें जग फार वाईट आहे !" म्हातारी म्हणाली "यांत सोय म्हणून कांहीं नाहीं ! सगळी आपली गैरसोय ! गैरसोयीमुळें किती माणसांची कुचंबणा होत असेल देव जाणे !"

"अहो आजीबाई !" चाट्या म्हणाला, देव जर जाणत असता तर त्यानें जगांत ही गैरसोय कशाला ठेवली असती ? मनुष्यें जें जें मनांत आणतील तें तें त्यांना त्वरित मिळावें अशीच व्यवस्था जाणत्या देवानें केली असती !"

"देवानें अशी व्यवस्था केली नाहीं हेंच बरें आहे ! म्हातारीनें म्हटलें; "अशा व्यवस्थेनें गैरसोय दूर होण्याचें बाजूलाच राहून सगळीकडे अव्यवस्था मात्र माजेल आणि जगांतलीं एकूणएक माणसें दुःखी दिसूं लागतील !"

"दुःखी नाहीं दिसणार ! आजीबाई," चाट्या आवेशानें बोलला, "अशा व्यवस्थेनें जगांतील

एकूणएक माणसें सुखी दिसूं लागतील! माणसें दुःखी दिसतात याचें कारण त्यांच्या इच्छा पूर्ण होत नाहींत हें आहे. त्या त्यांच्या इच्छा जर पूर्ण होऊं लागल्या तर दुःखी दिसण्याचें त्यांना कांहीं कारणच शिल्लक रहात नाहीं! मग तीं सुखीच दिसणार!"

"माणसानें आपणावरून जग ओळखावें असें मी म्हणतें." म्हातारीनें म्हटलें. "तुझी इच्छा जर पूर्ण होऊं लागली तर तूं होशील का सुखी?"

"होईन म्हणजे?" चाट्यानें उत्तर केलें, "झालोंच पाहिजे मी सुखी!"

"तुझी कोणती इच्छा पूर्ण झाली तर तूं सुखी होशील असें तुला वाटतें तें मला सांगशील?" म्हातारीनें विचारलें.

"माझी इच्छा होय?" चाट्या म्हणाला, "माझी इच्छा अशी आहे कीं जें जें मी धरून ओढीन तें तें लांब होत जावें! असें झालें म्हणजे कापड मला पाहिजे तितकें स्वस्त विकतां येईल; माझ्या जवळचा कापडाचा सांठा कधींच संपणार नाहीं; मला केव्हांच

तोटा येणार नाहीं; आणि मी मोठा श्रीमंत शेटजी बनेन!"

"आजीबाई!" लांकूडतोड्या पुढें होऊन म्हणाला, "माझी इच्छा ऐका! ज्याला ज्याला म्हणून मी तडाखा देईन त्याचे त्याचे तात्काळ तुकडे व्हावे अशी माझी इच्छा आहे. ही जर पूर्ण झाली तर लांकडें तोडण्याची दगदग न पडतां मी चांगला श्रीमंत होईन अशी माझी खात्री आहे!"

"या दोघांनीं आपल्या इच्छा बोलून दाखविल्या." सुताराने म्हटलें, "आतां मी आपली इच्छा सांगतों ती पण आजीबाई तुम्हीं ऐकून घ्या! माझी इच्छा अशी आहे कीं जें जें म्हणून मी एकत्र जोडीन तें तें चिकटून त्याचा अगदीं एकजीव व्हावा. असें झालें म्हणजे माझ्या सामानाला भरपूर किंमत येईल. मग श्रीमंत होण्याला मला कितीसा उशीर?"

"तुमच्या सर्वांच्या इच्छा मी ऐकल्या." म्हातारी म्हणाली, "तुमच्या इच्छांप्रमाणें जर खरोखरच घडूं लागलें तर मला नाहीं वाटत तुम्हीं सुखी व्हाल

असें ! तुम्हीं पुन्हा नीट विचार करून सांगा. नाहीं तर मग पस्ताव्यांत पडाल."

"आम्हीं नीट विचार करूनच बोललों !" तिघांनीं उत्तर दिलें.

"आम्हीं प्रकट केलेल्या इच्छा अगदीं साध्या आहेत." ते म्हणाले. "आमच्या इच्छांप्रमाणें घडून येण्याची जरी आम्हांला आशा नसली तरी इच्छांप्रमाणें खरोखरच जर घडून येईल तर आम्हांला पस्तावण्याचें कांहींच कारण नाहीं."

"बरें तर !" म्हातारी म्हणाली; "आजपासून तुमच्या इच्छांप्रमाणें घडून येण्याला सुरवात होईल. आतां पहातें तुम्हीं कितपत सुखी होतां ते !"

असें म्हणून म्हातारी उठली आणि काठी टेंकीत टेंकीत तेथून निघून गेली.

म्हातारीच्या बोलण्याचें आश्चर्य करीत करीत ते तिघे प्रवासी देखील उठले आणि चालूं लागले.

त्या म्हातारीचें सांगणें त्यांना खरेंच वाटेना. तिनें आपली थट्टा केली असाच त्या सर्वांचा समज झाला.

बोलत बोलत ते वाटेनें चालले असतांना लांकूडतोड्याची कुऱ्हाड वाटेनजीकच्या एका झाडाला जरा जोरानें लागली: कुऱ्हाड लागतांच तें झाड खालीं पडलें आणि त्याचे तुकडे तुकडे झाले !

हा चमत्कार पाहून सुतार पुढें झाला आणि त्यानें त्या झाडाचे दोन तुकडे उचलून ते एकत्र जोडले. त्यानें असें करतांच ते तुकडे परस्परांना पक्के चिकटून बसले !

" या दोघांच्या इच्छांप्रमाणें घडून येऊं लागलें !" चाट्या मनांत म्हणाला, " आतां आपल्या इच्छेप्रमाणें घडतें कीं नाहीं हें पाहिलें पाहिजे. "

असें म्हणून त्यानें आपल्या खिशांतून एक चिंधी काढली आणि ती ओढून पाहिली. चिंधी लांब झाल्याचें त्याला आढळून आलें !

आपल्या इच्छांप्रमाणें खरोखरच घडून येऊं लागलें म्हणून त्या तिघांना हर्ष झाला आणि हर्षाच्या भरांत ते नाचूं लागले ! ! म्हातारीच्या रूपानें कोणीतरी वनदेवताच आपणाला भेटली अशी त्यांची खात्री झाली.

यानंतर सुमारें अर्धी घटका लोटली असेल नसेल तोंच चाट्यानें शेंबूड शिंकरीत असतांना आपलें नाक बोटांनीं धरून ओढलें. त्याबरोबर तें चांगलें पांच सहा आंगळें लांब झालें! चाट्याला




अशा रीतीनें गणपतीचें रूप प्राप्त झालेलें दिसतांच लाकूडतोड्याला हंसें आवरेना. तो सारखा हंसत सुटला. हंसून हंसून तो अगदीं बेजार झाला आणि त्याच्या डोळ्यांतून अश्रु वाहूं लागले!

चाट्याच्या नाकाची सोंड झालेली पाहून सुताराला जें आश्चर्य वाटलें त्या आश्चर्याच्या भरांत त्यानें चटकन् टाळी वाजविली आणि तोहि हंसत सुटला. पण टाळी वाजवितांच त्याचे दोन्ही हात एकमेकांना चिकटले ते कांहीं केल्या सुटेनात !

आपले दोघे सोबती आपणाला हंसताहेत असें पाहून चाट्या अगदीं ओशाळून गेला. म्हातारीपाशीं आपण जी इच्छा प्रकट केली ती केली नसती तर बरें झालें असतें असें त्याला आतां वाटूं लागलें.

आपले चिकटलेले हात कांहीं केल्या सुटत नाहींत असें पाहून सुतार चिंताक्रांत झाला.

"काय हो हा आमचा मूर्खपणा !" सुतार म्हणाला, "तरी ती म्हातारी म्हणत होती कीं तुम्हीं पस्तावाल म्हणून. तिचेंच म्हणणें खरें झालें असें निदान मला तरी वाटतें."

"मलादेखील तुझ्यासारखें वाटतें." लांकूडतोड्या म्हणाला, "कारण तुकडे करण्यापलीकडे मला आतां कांहींच करतां येणार नाहीं ! तुझे चिकटलेले हात मी

सोडवूं लागलों तर त्यांचे तुकडे तुकडे होतील असें मला भय वाटतें. यामुळें तुला मदत करण्याची इच्छा असतांहि मदत करण्याला मी असमर्थ बनलों आहें!"

"मी तुझ्या मदतीला आलों तर तुझे हात लांब मात्र होतील!" चाट्या म्हणाला, "ते सुटणार नाहींत! यामुळें इच्छा असूनदेखील तुला मी मदत करूं शकत नाहीं अशी माझी स्थिति झालेली आहे!"

तिघेहि झाल्या गोष्टीचा पश्चात्ताप करीत बराच वेळ तेथें बसले. आपण समाधानवृत्तीनें राहिलों नाहीं, आपला लोभ अनावर झाला; त्याचेंच हें फळ आज आपण भोगीत आहोंत असें त्यांना वाटूं लागलें.

"आल्या प्रसंगाला धैर्यानें तोंड देऊन आम्हीं आपला उद्योग प्रामाणिकपणानें नि नेटानें चालविला असता तर—" लांकूडतोड्या बोलला.

"तर आम्हांला घरींदेखील चांगले दिवस आले असते!" चाट्यानें लांकूडतोड्याचें वाक्य पुरें केलें.

"आतां याच स्थितींत आम्हीं मरणार असें दिसतें!" सुतार रडवेला होऊन म्हणाला.

इतक्यांत पूर्वीची ती म्हातारी तेथें आली.

"कसें काय बाबांनो!" म्हातारीनें त्यांना म्हटलें, "झालेत ना एकदांचे सुखी?"

"माते यक्षिणी!" ते तिघे तिला म्हणाले, "कृपा कर! कृपा कर! नि सोडीव लवकर आम्हांला या महाघोर संकटांतून!"

होय! यक्षिणीच आहें मी. कामेश्वरी माझें नांव!" म्हातारी म्हणाली; "तुमच्या इच्छा मी पूरविल्या. तुमच्या म्हणण्याप्रमाणें तुम्हीं आतां सुखांत असावयाचे! मग महाघोर संकटांतून सोडीव म्हणून माझी प्रार्थना कशासाठीं?"

"माते!" तिघांनीं दीनवाणीनें तिला म्हटलें, "तुला सगळें कांहीं कळतें आहे! या दीन लेंकरांचा आतां आणखीं अंत पाहूं नकोस! सोडीव लवकर आम्हांला! जळोत त्या आमच्या इच्छा! त्याप्रमाणें आतां केव्हांहि न होऊं दे! या संकटांतून मुक्त होतांच आम्हीं पुन्हां घरीं जाऊन सुखासमाधानानें राहूं."

यक्षिणीला त्यांची दया आली. त्यांना पूर्वीं दिलेले

वर तिनें मार्गे घेतले आणि त्यांना संकटमुक्त केलें.

त्यानंतर ते तिघे प्रवासी आपापल्या घरीं परत जाऊन आनंदानें राहूं लागले. पुन्हा त्यांनीं कुरकुर अशी केव्हांहि केली नाहीं. लोकांच्या उपयोगीं पडावें, वर्तन निष्पाप ठेवावें आणि प्रामाणिकपणानें उद्योग करावा अशा प्रकारचा त्यांचा चरित्रक्रम चालू झाला.

—आणि त्यामुळें लवकरच ते सर्वांना प्रिय झाले.

झाली, संपली गोष्ट !

" काका ! तुमच्याजवळच्या गोष्टी संपल्या होत्या ना ? मग ही हो कुठली गोष्ट ? "

" जवळचा सांठा संपल्यावर मुद्दाम पैदा केलेली ही नवी गोष्ट आहे ! "

" मग हिच्यासारखीच आणखी एखादी नवी गोष्ट सांगा ना. "

" बरें बुवा ! सांगतों दुसरी एक नवी गोष्ट ! ऐका ! "

# २. पुराण पुरुष

मागें एकदां एका कसब्यांत एक बुवा आला नि तेथल्या गणपतीच्या देवळांत राहिला. त्याचें शरीर खारके सारखें सुरकुतलेलें होतें.

मक्याच्या कणसाची शेंडी तुम्हीं पाहिलेली आहे. त्या शेंडीचा रंग कसा असतो तेंहि तुम्हांला ठाऊक आहे. त्या शेंडीचा रंग जसा असतो तसल्या रंगाची त्या बुवाची दाढी होती. ती त्याच्या बेंबीपर्यंत लोंबत होती.

त्याच्या डोक्यावरील केस अंबाडीसारखे दिसत, नि ते मोकळेच सोडलेले असत.

बुवा जरी पिकलेले आणि सुरकुतलेले असले तरी त्यांचें हाडपेर मजबूत होतें. गांवांत ते ओली भिक्षा मागत आणि ती भक्षण करून देवळांत माळेचे मणि ओढीत बसत.

असें चाललें असतां गांवांतील बरीच मंडळी बुवांच्या भजनीं लागली. या मंडळीनें बुवांना ‘ महाराज ’ म्हणावयास सुरवात केली. परंतु बुवांनी एके दिवशीं

आपल्या भक्तमंडळीला सांगितलें कीं, “ मला ‘महाराज’ म्हणूं नका ! ‘ पुराण पुरुष ’ म्हणा ! ”

बुवांच्या या सांगण्याचें मंडळीला आश्चर्य वाटलें; आणि “ आपलें वय काय? ” असा मंडळींतील एका मनुष्यानें बुवांना प्रश्न केला.

“ राम आणि सीता यांच्या लग्नाला वर्षें किती झालीं ? ” बुवांनीं उलट प्रश्न केला.

“ कोणाला ठाऊक ?” मंडळी म्हणाली, “ पुराण काळच्या त्या हकीगती ! पुराणिक बुवा पुराण सांगूं लागले म्हणजे ऐकायच्या ! वर्षांची चवकशी करतो कोण ? शाळेंतल्या पोरांसारखें आम्हाला आतां इतिहासाच्या परीक्षेला थोडेंच बसायचें आहे ! तरी पण राम आणि सीता यांच्या लग्नाला हजारों वर्षें लोटलीं यांत शंका नाहीं. पांडव वनवासांत असतांना त्यांना एका ऋषीनें राम नि सीता यांची गोष्ट सांगितलीन् असें पोथींत आहे. पांडवांनाच पांच हजार वर्षें झालीं असें म्हणतात ! राम नि सीता हीं पांडवांच्या आधींचीं त्यांच्या लग्नाला किती हजार वर्षें झालीं असतील हें कोणीं सांगावें ? ”

" राम आणि सीता यांच्या लग्नसमारंभाच्या वेळीं जनक राजाच्या वाड्यांत मी तूप वाढण्याच्या कामावर होतों. " बुवा म्हणाले, " त्यावेळीं माझें वय चाळीस वर्षांचें होतें. यावरून माझें आजचें वय काय असेल तें पहा ! "

" महाराज पुराण पुरुष खरे ! " मंडळी मान डोलवीत डोलवीत म्हणाली, त्या दिवसापासून बुवांची 'पुराण पुरुष' म्हणून झपाट्यानें प्रसिद्धि होऊं लागली !

या प्रसिद्धीमुळें बुवांकडे येणाऱ्या लोकांची संख्या वाढली. त्या लोकांमध्यें कांहीं जण बुवांना आपल्या शंका विचारणारेहि असत. बुवा त्यांच्या शंकाचें अर्थातच ताबडतोब निरसन करून टाकीत !

" महाभारताला इतिहास कां म्हणतात आणि रामायणाला काव्य कां समजतात ? " असें कोणीं विचारलें तर बुवा त्याला सांगत—

" जसें झालें तसें व्यासानें लिहून काढलें म्हणून व्यासाच्या महाभारताला इतिहास म्हणतात. वाल्मीकीनें जसें झालें तसें लिहून काढलें नाहीं; त्यानें त्यांत

पुष्कळ फेरफार केले म्हणून वाल्मीकींच्या रामायणाला कोणी इतिहास समजत नाहींत."

"वाल्मीकीनें केलेले फेरफार कोणते ?" असा कोणीं प्रश्न केला तर बुवा त्याला उत्तर देत—

"वाल्मीकीनें सीता ही जनक राजाला जमीन नांगरतांना सांपडली असें लिहिलें आहे. पण तें खोटें आहे. सीता ही जनकाला जमीन नांगरतांना सांपडलेली मुलगी नसून ती त्याचीच स्वतःची मुलगी होती. तसेंच कबंध हा राक्षस नव्हता. तें एक प्रकारचें चमत्कारिक झाड होतें. रावणाला दहा तोंडें नसून एकच तोंड होतें. रावणाच्या आधीं लंकेचा जो राजा होता त्याचें नांव कुबेर असें होतें. रावण हा कुबेराच्या राज्यांतला एक देशमुख होता. कुबेराविरुद्ध बंड करून त्यानें कुबेराला पळवून लावलें आणि लंकेचें राज्य घेतलें. वाल्मीकीनें देशमुख रावणाला दशमुख असें मुद्दाम म्हणून तो दहा तोंडांचा होता असें वर्णन केलें! रावण शब्दाचा अर्थ 'ओरडणारा' असें वाल्मीकि सांगतो. पण रावण हा शब्द वास्तविक पहातां 'रावन्'

२३५२

असा उच्चारला पाहिजे. 'रावन्' शब्दाचा खरा अर्थ 'राजा' असा आहे. हे आणि अशांसारखे आणखी कितीतरी फेरफार वाल्मीकीनें केलेले आहेत!"

बुवांकडून अशा प्रकारची माहिती जेव्हां बाहेर पडे तेव्हां ती ऐकणारे लोक आश्चर्यानें आ पसरीत! बुवा हे सात चिरंजीवांपैकीं तर कोणी नसतील ना, असेंहि त्यांच्या मनांत येई.

मंडळीची याच संबंधीं एकदां आपसांत चर्चा झाली ती अशी कीं, सात चिरंजीव म्हटले म्हणजे बळि, पर्शुराम, मारुतिराय, बिभीषण, कृपाचार्य, अश्वत्थामा आणि व्यासमुनि हे होत. यांतले शेवटले तीन कौरवपांडवांच्या वेळचे; अर्थात् रामाच्यानंतरचे. तेव्हां बुवा हे त्या तिघांपैकीं कोणी नव्हत. आतां पहिल्या चारांतले हे कोणी असतील म्हणावें तर बटु वामनाला तीन पावलें भूमि दान दिल्यापासून बळिराजा पाताळीचें राज्य करतो आहे; रामाकडून पराभव पावल्या वेळेपासून पर्शुराम महेंद्रपर्वतावर नाक धरून बसलेला आहे; रामावताराची समाप्ति

झाल्यापासून मारुतिरायांचें "राम! राम! राम! राम! सीताराम! सीताराम!" असें चुटक्या वाजवीत अखंड भजन चालू आहे. बिभीषण लंकेचें राज्य चालवीत आहे. म्हणून या चौघांपैकींदेखील हे कोणी दिसत नाहींत! अशी मोठी चर्चा करून मंडळींनें शेवटीं असें अनुमान काढलें कीं, बुवा हे बहुतकरून अप्रसिद्ध असे आठवे चिरंजीव असावे!

बुवा हे 'पुराण पुरुष' म्हणून जशी प्रसिद्धी झाली तशीच ते 'आठवे चिरंजीव' म्हणून देखील प्रसिद्धी झाली. बुवांनीं रामायणांतील जेवढ्या चुका दाखविलेल्या होत्या त्या सर्वांची एक जंगी यादी तयार करण्यांत आली. त्या जंगी यादीच्या प्रती काशीपासून रामेश्वरपर्यंत रवाना करून रामायणाच्या यच्चयावत् पोथ्या दुरुस्त करविण्याची खटपट जारीनें करावयाची आणि रामायणाला इतिहास या सदरांत बसवावयाचें असें बुवांच्या भक्त मंडळींनें ठरविलें!

बुवांच्या भक्तमंडळींची अशी धामधूम चालू असतां त्या कसब्यांत एके दिवशीं एक दूरचा मनुष्य आला.

रात्रींच्या वेळीं बुवा देवळांत एकटेच आहेत, त्यांच्यापाशीं दुसरें कोणी नाहीं अशी संधि साधून तो बुवांच्या दर्शनाला गेला.


"पुराणपुरुष बावा!" बुवांना नमस्कार करून त्या मनुष्यानें सरळ प्रश्न केला, "आपलें वय काय?"

"राम आणि सीता यांच्या लग्नांत मी तूप वाढायला होतों. यावरून पहा!" बुवांनीं उत्तर दिलें.

"त्यावेळीं आपलें वय अजमासें किती असेल?" बुवांकडे रोखून पहात त्या मनुष्यानें विचारिलें.

"चाळीस वर्षांचें!" बुवांनीं सांगितलें.

"अरे चोरा! बरा सांपडलास! तूंच तो! शंका नको! आतां दाखवतों तुला!" असें म्हणून त्या मनुष्यानें बुवांच्या आंगावर एकदम झडप घातली! बुवांना उताणें पाडून त्यांच्या तो छातीवर बसला! बुवांची दाढी त्यानें डाव्या हातानें गच्च धरून त्या हाताच्या मनगटाला तिचे देववले तेवढे वेढे दिले आणि उजव्या हातानें तो बुवांना गुद्दयांमागून गुद्दे लगावूं लागला!



दाढी सपाटून ताणली गेल्यामुळें बुवांच्या हनुवटीला कळा लागल्या. हवें तसें तोंड हालवून बोलतां येणें त्यांना अशक्य झालें. शिवाय गुद्द्यांमागून गुद्दे मिळत होते त्याचें दुःख वेगळेंच ! ही सर्व पीडा असह्य होऊन बुवा मोठ्यानें ओरडले! परंतु देवळाच्या जवळपास वस्ती नसल्यामुळें त्यांच्या ओरडण्याचा उपयोग नव्हता.

बुवांच्या छातीवर बसलेला मनुष्य दाढीवरचा ताण ढिला करून बुवांना म्हणाला, "मला तूं ओळखतोस?"

" नाहीं बाबा ! " बुवा कष्टानें बोलले.

" ऐक तर मी कोण तो ! " तो मनुष्य म्हणाला, "तूं जसा राम आणि सीता यांच्या लग्नांत तूप वाढायला होतास तसा मी जेवायला होतों. तूं तूप वाढीत वाढीत माझ्या पानापाशीं आलास तेव्हां मला द्रोण भरून तूप वाढ असें मीं तुला सांगितलें. पण माझ्यावर डोळे तांबारून मला तूप न वाढतांच तूं पुढें चालता झालास ! तूप खर्चत होतें मिथिलेच्या जनक राजाचें. त्याचा बोलून चालून वाढपी तूं ! त्या तुला लेका वाढप्याला रे एवढी गुर्मी कशाला हवी होती ? मला तूप न मिळाल्यामुळें माझी प्रकृति बिघडून मला पुढें कित्येक महिने अंथरुणाला खिळून पडावें लागलें ! पण त्याच वेळीं मी मनांतल्या मनांत प्रतिज्ञा केली कीं दुखण्यांतून उठलों म्हणजे तुला गांठून तुझी हड्डी चांगली नरम करायची ! बरा झाल्यावर तुला शोधीत मी फिरूं लागलों. पण तूं कोठें दडी देऊन बसला होतास न कळे ! रामावतार समाप्त होऊन त्रेतायुग संपलें तरी तुझा पत्ता नाहीं !

द्वापारयुग खलास झालें तरी तूं सांपडला नाहींस ! परंतु मी निश्चयच केलेला होता कीं तुझा पत्ता लावून तुझी हड्डी नरम केल्याखेरीज विश्रांति म्हणून घ्यायची नाहीं ! कलियुगाचीं पांच हजार वर्षें झालीं तेव्हां आतां तूं मला सांपडलास ! आतां तुला मी सोडीन होय ?"

असें बोलून त्या मनुष्यानें बुवांना आणखी दोन गुद्दे लगावले !

"मला सोड !" बुवा गयावया करूं लागले, "मी तो नव्हे !"

"नव्हेस कसा ?" तो मनुष्य म्हणाला, "तूंच तो !"

"देवाची शपथ, गायत्रीची शपथ, गळ्या शपथ, मी खरेंच सांगतों !" बुवा म्हणाले, "मी तो नव्हे ! माझें वय अवघें अडुसष्ट वर्षांचें आहे. येथल्या लोकांना भोळसर पाहून मी त्यांची थोडी गंमत केली. इतकेंच ! मला तूं सोडलेंस तर रातोरात मी येथून चालता होईन !"

" आणि गांवकऱ्यांना बनवलें आहेस त्याची काय वाट ?" त्या मनुष्यानें प्रश्न केला.

"त्यांना खरी हकीगत तूंच सांग !" बुवा

म्हणाले, " मी सांगितली तर लगेच त्यांच्या हातचा मला मार खावा लागेल ! "

" मी नाहीं सांगणार त्यांना तुझी खरी हकीगत ! " तो मनुष्य बोलला; " तुझी खरी हकीगत तूंच थोडक्यांत लिहून काढ. तिच्या शेवटीं लोकांना बनवल्याबद्दल त्यांची माफी माग आणि खालीं आपली सही कर. असें करीत असलास तरच तुला मी सोडीन. नाहीं तर तुझी दाढी धरून या कसब्यांत घरोघर तुला मी फिरवीन, तुझ्या लुच्चेगिरीचा उच्चार तुला मी घरोघर करायला लावीन आणि प्रत्येक घराच्या उंबरठ्यावर तुझ्याकडून नाक घांसवीन! तूं काय समजला आहेस ?"

" देतों बाबा मी आपली हकीगत थोडक्यांत लिहून. नि मागतों माफी लोकांची!" बुवांनीं सांगितलें.

नंतर त्या मनुष्यानें बुवांना सोडलें. बुवांच्या भक्तांनीं बुवांच्या उपयोगासाठीं देवळांत लेखनसाहित्य ठेवलेलें होतेंच. बुवांनीं त्यांतूनच एक कागद घेतला, त्याच्यावर आपली खरी हकीगत थोडक्यांत लिहिली, तिच्या शेवटीं लोकांची क्षमा मागितली आणि खालीं

सही करून तो कागद त्या मनुष्यापाशीं दिला.

त्या मनुष्यानें तो वाचून पाहून त्याची घडी केली व तो आपल्यापाशीं ठेवून दिला. नंतर बुवांना तो मनुष्य म्हणाला, "गांवकऱ्यांकडून होणारा शेणमार चुकवावयाचा असेल तर आत्तांच्या आत्तां येथून काळें कर! आणखीं पुन्हा असले चाळे दुसऱ्या कोठें केलेस तर याद राख!"

"मला आतां तो देशमुख रावन् नको, नि तो शेणमार पण नको!" असें म्हणून बुवा त्या देवळांतून बाहेर पडले आणि रातोरात त्या कसब्यांतून पोबारा करते झाले! तो मनुष्य मात्र देवळांत थोडा वेळ राहून नंतर आपल्या बिऱ्हाडीं गेला.

सकाळीं गांवकरी बुवांच्या समाचारासाठीं देवळांत आले. पहातात तो देवळांत बुवा नाहींत! देवळाच्या एका खांबावर एक कागद चिकटवलेला होता व त्यावर कांहीं मजकूर लिहिलेला होता. तो मजकूर वाचून पाहिल्यावर त्या लोकांचीं तोंडें पहाण्यालायक झालीं!

---

# ३. कधीं न संपणारी गोष्ट !

" काका आतां आम्हांला एक चांगली, सुरेख नि मोठीशी गोष्ट सांगा ! "

' म्हणजे ? आतांपर्यंत सांगितल्या त्या गोष्टी चांगल्या नव्हत्या कीं काय ? '

" चांगल्या होत्या. पण त्या काय, इवल्या इवल्या गोष्टी ! माशीच्या पंखाएवढ्या ! त्या लवकर संपल्या ! "

" मग काय तुम्हांला लवकर न संपणारी गोष्ट पाहिजे ? "

" होय ! "

' बरें; पण गोष्टीला सुरवात करण्यापूर्वीं मी असें विचारतों कीं, तुम्हांला लवकर न संपणारी गोष्ट पाहिजे कीं कधीं न संपणारी गोष्ट पाहिजे ? '

" काय ? कधीं न संपणारी गोष्ट ! "

' होय ! कधीं न संपणारी गोष्ट ? '

" सांगा ! सांगा ! कधीं न संपणारी गोष्टच सांगा ! "

' ऐका तर ! '

एक होता राजा. तो राजा आपल्या राज्यांतील

शेतकऱ्यांपासून जो कर घेई तो पैशांच्या रूपानें न घेतां धान्याच्या रूपानें घेई. शेतकऱ्यांना उत्पन्नाचा सहावा हिस्सा कर म्हणून राजाला द्यावा लागे. म्हणजे समजा, कीं जर एखाद्या शेतकऱ्याचें सहा खंडी भात पिकलें तर त्याला त्यांतलें एक खंडी भात कर म्हणून राजाला द्यावें लागे.

गांवोगांवच्या शेतकऱ्यांकडून येणारा गल्ला सांठवून ठेवण्यासाठीं महालाच्या गांवीं सरकारी कोठारें असत.

महालाच्या एका गांवांतील अशा कोठारांपैकीं भाताचें एक प्रचंड कोठार जुनें झालेलें होतें. त्याच्या वरच्या बाजूला एक भोंक पडलेलें होतें. सरकारी अधिकाऱ्याला या भोंकाकडे लक्ष्य द्यावें असें वाटलें नाहीं. कोठार जुनें असलें तरी अजून पांच सहा वर्षें टिकेल असें तो म्हणाला आणि त्या कोठारांत त्यानें नवें भात भरलें.

त्या कोठाराला पडलेलें भोंक एक दिवशीं एका चिमणीनें पाहिलें. त्या भोंकांतून आपणाला कोठारांत जातां येईल असें तिला वाटलें.

चिमणी कोठारापाशीं गेली. कोठाराला पडलेल्या भोंकांतून आंत शिरली आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर आली.

"पोटाला मिळविण्यासाठीं आतां मुलुखभर हिंडायला नको!" भातगोट्यांतला तांदूळ खाऊन चिमणी आनंदानें म्हणाली, आणि ती बातमी दुसऱ्या चिमण्यांना सांगण्यासाठीं तेथून उडाली.

दुसऱ्या चिमण्यांना जेव्हां ती बातमी समजली तेव्हां ठिकठिकाणच्या चिमण्यांचे थवेच्या थवे त्या कोठारापाशीं येऊन थडकले. सर्व चिमण्यांना एकाच वेळीं कोठारांत शिरतां येणें शक्य नव्हतें. कारण कोठाराचें भोंक लहान होतें. त्या भोंकांतून एका वेळीं एकाच चिमणीला आंत जातां येण्यासारखें होतें. म्हणून थव्यांतील पुढारी चिमण्यांची बैठक भरून तींत असा ठराव करण्यांत आला कीं, एक चिमणी जोंपर्यंत आंत असेल तोंपर्यंत दुसऱ्या चिमणीनें कोठारांत शिरूं नये. तसेंच कोठारांत जाणाऱ्या चिमणीनें फक्त एक भातगोटा घेऊनच बाहेर पडावें. कोणींहि कोठारांत वाजवीहून अधिक वेळ राहूं नये.



पुढारी चिमण्यांच्या बैठकींत झालेला हा ठराव सगळ्या थव्यांतील चिमण्यांना कळविण्यांत आला. सगळे थवे मिळून एक प्रचंड थवा बनविण्यांत येऊन कोठारांतील भात पळविण्याच्या कामाला सुरवात झाली !

चिमण्यांच्या त्या प्रचंड थव्यांतून प्रथम एक चिमणी उठली, कोठारांत शिरली आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर आली.

मग दुसरी एक चिमणी उठली, कोठारांत शिरली

आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर आली.

ती बाहेर पडल्यावर आणखीं एक चिमणी उठली, कोठारांत शिरली आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर आली.

ती बाहेर येतांच आणखीं एक चिमणी उठली, कोठारांत शिरली आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर आली.

ती बाहेर पडतांच—

"हें हो काय काका ?"

'कां ? काय झालें ?'

"असें काय हें आपलें एकसारखें, एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, नि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली. असली कसली ही गोष्ट ?"

'कसली गोष्ट म्हणजे ? भाताचें कोठार आणि चिमण्या यांची कधीं न संपणारी गोष्ट !'

"ही अशीच का पुढें चालायची ?"

"अशीच म्हणजे कशी ?"

"एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, नि

चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली अशी.'

'हें पहा, तें कोठार होतें प्रचंड, आणि त्यांतलें भात पळविण्यासाठीं गोळा झालेल्या चिमण्यांचा जमाव देखील होता प्रचंड, कोठाराच्या भोंकांतून एका वेळीं एकच चिमणी आंत जाई, आणि ती बाहेर पडल्याखेरीज दुसऱ्या चिमणीला आंत जातां येत नसे. म्हणून कोठारांतलें भात खलास होईपर्यंत ही गोष्ट अशीच चालायची!'

"कोठारांतलें भात खलास झाल्यावर मग पुढें काय झालें?"

'तें आधीं नाहीं सांगतां यायचें! आधीं कोठारांतलें भात खलास होऊं दे!'

"कोठारांतलें भात खलास कधीं होणार?"

'तें तरी आधीं कसें सांगतां येईल? एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, आणखीं चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर आली; इतकें सांगावें तेव्हां कोठारांतला कुठें एक भातगोटा खलास होतो. असे लक्षावधि भातगोटे त्या कोठारांत! ते सगळे खलास

व्हायला किती वेळ लागेल हें कोणीं सांगावें? आपलें एक चिमणी उठली, कोठारांत शिरली आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन् बाहेर आली असें सांगत राहून एकेक भातगोटा खलास करीत असावें! असें करतां करतां सगळे भातगोटे कधीं संपतील तेव्हां संपतील! म्हणून गोष्ट पुढें ऐका—

एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, आणखीं चोंचींत एक भातगोटा घेऊन—'

"आम्हाला नको असली गोष्ट! पुरे झाली! हें काय मेलें एकसारखें! एक चिमणी उठली, कोठारांत शिरली नि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली!"

'या गोष्टीला तुम्हीं इतक्यांतच कंटाळलांत! पण हीच गोष्ट सांगून एक मनुष्य राजाचा जांवई झाला आणि राजाच्या मागून सिंहासनारूढ होऊन स्वतः राजा बनला! माहीत आहे?'

"नाहीं माहीत आम्हांला! ही असली गोष्ट सांगून तो मनुष्य राजाचा जांवई कसा हो झाला काका?"

'ऐका कसा झाला तें!'

मागें एकदां एक राजा होऊन गेला. त्याला गोष्टी ऐकण्याचा भारी नाद असे. त्यानें किती जरी गोष्टी ऐकल्या तरी त्याची तृप्ति होईना ! प्रथम त्यानें छोट्या छोट्या गोष्टी ऐकल्या. पुढें त्याला मोठमोठ्या गोष्टी हव्याशा झाल्या. परंतु कोणीं कितीहि मोठी गोष्ट सांगितली तरी ती केव्हांतरी संपल्याखेरीज रहात नसे; आणि गोष्ट संपली कीं राजा म्हणे, " हात्तिच्या ! एवढीच का सारी गोष्ट ? "

मोठमोठ्या गोष्टी सुमारें दोन वर्षेपर्यंत त्या राजानें ऐकल्या. नंतर त्याला असें वाटलें कीं, सध्यांचे गोष्टी सांगणारे लोक कांहीं कामाचे नाहींत. कारण त्यांनीं केवढ्या जरी मोठ्या गोष्टी सांगितल्या तरी अखेरीला त्या संपतात ! तेव्हां कधीं न संपणारी गोष्ट सांगणारा असा एखादा मनुष्य पैदा केला पाहिजे !

राजाला असें वाटलें मात्र, लागलाच त्यानें आपल्या प्रधानाला हुकूम केला कीं, " ज्याला कधीं न संपणारी गोष्ट येत असेल असा मनुष्य तूं शोधून काढ, आणि त्याला माझ्याकडे घेऊन ये. "

प्रधानानें आपल्याकडून पुष्कळ प्रयत्न केला, परंतु कधीं न संपणारी गोष्ट येत असलेला मनुष्य त्याला आढळला नाहीं.

तो राजा आपणाला कथाप्रिय म्हणवी. कधीं न संपणारी गोष्ट येत असलेला मनुष्य आपल्या प्रधानाला सांपडत नाहीं म्हणून तो नाउमेद झाला नाहीं. त्याला असें वाटलें कीं मोठें बक्षिस लावलें तर कधीं न संपणारी गोष्ट येत असलेला मनुष्य आपण होऊनच पुढें येईल. पण बक्षिसाच्या आशेनें पुष्कळ लबाड लोकदेखील पुढें येऊन आपणास ठकविण्याचा उद्योग करण्याचा संभव आहे. त्यांना दहशत म्हणून मोठ्या बक्षिसाबरोबर तशीच मोठी शिक्षा ठेवली पाहिजे.

असा विचार करून त्या राजानें आपल्या राज्यांत आणि शेजारच्या सर्व देशांत असें जाहीर केलें कीं ज्याला कधीं न संपणारी गोष्ट येत असेल त्यानें कथाप्रिय महाराजांकडे यावें आणि आपणाला येत असलेली गोष्ट सांगावी. त्याला येत असलेली गोष्ट कधीं न संपणारी आहे अशी कथाप्रिय महाराजांची

खात्री झाल्यास महाराज त्याला आपली एकुलती एक कन्या देऊन आपला जांवई करतील आणि महाराजांच्या पश्चात् तो जांवईच राज्याचा मालक होईल. पण त्याला येत असलेली गोष्ट कधीं न संपणारी आहे अशी जर महाराजांची खात्री झाली नाहीं तर महाराजांना ठकविण्याचा प्रयत्न केल्याच्या गुन्ह्याबद्दल त्या मनुष्याला सुळीं दिलें जाईल !

हें जाहीर झाल्यानंतर राज्य आणि राजकन्या यांच्या लोभानें कित्येक अविचारी लोकांनीं कथाप्रिय राजाकडे धांव मारली. आपणाला मोठमोठ्या गोष्टी येत आहेत, त्यांतली एखादी गोष्ट सांगून आपण राजकन्या मिळवूं व राजाच्या पश्चात् राज्याचे मालक होऊं असें त्यांना वाटलें. मोठी गोष्ट म्हणजे कधीं न संपणारी गोष्ट नव्हे हें त्यांच्या लक्ष्यांतच आलें नाहीं ! याचा परिणाम व्हायचा तोच झाला. कोणाची गोष्ट पंधरा दिवसांनीं, कोणाची महिन्यानें तर कोणाची तीन महिन्यांनीं संपली, आणि त्या सर्वांना सुळीं जावें लागलें !

ते लोक अशा रीतीनें जिवाला मुकलेले पाहून

राजाला गोष्ट सांगण्याचें धाडस मग कोणाला करवेना. सहा महिने लोटले. तरी गोष्ट सांगण्यासाठीं राजापुढें एकदेखील मनुष्य आला नाहीं.

सहा महिन्यानंतर दूर देशाचा एक मनुष्य राजवाड्यापाशीं आला आणि "मला कधीं न संपणारी गोष्ट येत असून ती महाराजांना सांगण्यासाठीं मी आलों आहें." असें त्यानें द्वारपाळाला सांगितलें.

तो आल्याची वर्दी द्वारपाळानें राजाकडे जाऊन दिली. तेव्हां राजानें त्या मनुष्याला आंत बोलावलें.

"तुला कधीं न संपणारी गोष्ट येते आहे काय ?" राजानें त्याला विचारलें.

"होय सरकार !" त्या मनुष्यानें उत्तर दिलें.

"जर तुझी गोष्ट संपली तर तुला सुळीं जावें लागेल हें ठाऊक आहे ना ?" राजा म्हणाला.

"आहे सरकार !" त्या मनुष्यानें सांगितलें.

"कर तर मग आपल्या गोष्टीला सुरवात !" राजानें आज्ञा केली.

राजाज्ञेवरून त्या मनुष्यानें राजाला जी गोष्ट

सांगण्याला आरंभ केला ती गोष्ट म्हणजे नुकतीच तुम्हांला मी सांगितलेली गोष्ट होय.

'एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली!' असें सारखें आठ दिवसपर्यंत राजा ऐकत होता! आठ दिवसांनंतर तो गोष्ट सांगणाराला म्हणाला—

"चिमण्यांचें आतां हें पुरे झालें! आतां पुढें काय घडलें तें सांगा."

"आधीं काय घडलें तें इत्थंभूत सांगितल्याशिवाय पुढें काय घडलें तें मला सांगतां येणार नाहीं!" गोष्ट सांगणारा बोलला; आणि आपली गोष्ट त्यानें पुढें चालविली—

"नंतर आणखीं एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली!"

असें सहा महिने चाललें. तेव्हां राजा म्हणाला, "तुझ्या या चिमण्यांचा मला कंटाळा आला! या चिमण्या आपलें भात पळविण्याचें काम संपवणार तरी कधीं?"

"कधीं संपवणार तें कुणीं सांगावें ?" गोष्ट सांगणारा म्हणाला, "या वेळपर्यंत कोठारांतलें जें भात संपलें आहे तें कोठारांतलि एकंदर भाताच्या हजाराव्या हिश्या इतकेंदेखील नाहीं ! तरी पण सरकारांनीं धीर न सोडतां ही गोष्ट अशीच पुढें ऐकल्यास एक दिवस खात्रीनें असा उजाडेल कीं त्या दिवशीं चिमण्यांनीं आपलें भात पळविण्याचें काम संपविलें असें सरकारच्या कानीं पडेल यांत संशय नाहीं !"

यावर राजा कांहीं बोलला नाहीं. तेव्हां गोष्ट सांगणारा आपली गोष्ट पुढें सांगूं लागला, "नंतर आणखीं एक चिमणी उठली, कोठारांत शिरली आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली !"

गोष्टीला सुरवात होऊन एक वर्ष लोटलें. तरी गोष्ट सांगणाराचें "नंतर एक चिमणी उठली, कोठारांत शिरली, आणि चोंचींत एक भातगोटा घेऊन बाहेर पडली !" हें चालूच होतें ! तें ऐकून ऐकून राजाचे कान किटले.

"माझी मुलगी मी तुला देतों; माझा वारस मी

तुला करतों. पण आपली ही गोष्ट बंद कर !" राजा ओरडला, "तुझ्या या चिमण्यांनीं मला वैताग आणला अगदीं !"

"सरकारची आज्ञा म्हणून गोष्ट सांगण्याचें मी बंद करतों." गोष्ट सांगणारा म्हणाला, "पण याचा अर्थ माझी गोष्ट संपली असा मात्र नव्हे !"

"तें मला माहीत आहे." राजा म्हणाला; "आणि म्हणूनच तुला मी आपला जांवई आणि वारस करीत आहें."

कबूल केल्याप्रमाणें राजानें त्याला आपली मुलगी दिली आणि कधीं न संपणारी गोष्ट सांगणारा तो मनुष्य राजाच्या पश्चात् राजा झाला !

❦ ❦ ❦

पुष्कळ झाल्या आज गोष्टी सांगून ! जा आतां निजायला ! उशिरांसर जागूं नये. म्हटलें आहे, "लवकर निजे, लवकर उठे, तया ज्ञान, संपत्ति, आरोग्य भेटे !"

2352

IRBK-0102372

IRBK-0102372